प्रेसनोट दिनांक १९/०३/२०२४

**ठाणे - मु. उचले, पो. तुळई, ता. मुरबाड, जि. ठाणे येथील ग्रामपंचायत कार्यालय उचले चे सरपंच यांचे पती खाजगी इसम यांना लाच स्विकारताना लाचलुचपत विभागाने रंगेहात पकडलेबाबत.**

| | | |
|---|---|---|
| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग/घटक | :- | ठाणे |
| गुन्हा नोद कमांक | :- | मुरबाड पोलीस स्टेशन, ठाणे ग्रामीण गुन्हा रजि. नं. ७४/२०२४, भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम १९८८ (सुधारित २०१८ चे) चे कलम ७अ, १२ प्रमाणे. |
| लोक सेवकाचे नाव व कार्यालय | :- | १) आरोपी खाजगी इसम संतोष रमेश खंडागळे,<br>२) इतर आरोपी लोकसेवक सोमनाथ हरिश्चंद्र देशमुख, पद सदस्य-ग्रामपंचायत उचले, |
| मागितलेली लाचेची रक्कम | :- | ७०,०००/- रूपये |
| स्विकारली लाचेची रक्कम | :- | ७०,०००/- रूपये |
| थोडक्यात हकीकत | :- | तक्रारदार यांनी उचले ग्रामपंचायतचे जल जीवन मिशन योजने अंतर्गत मंजूर नळपाणी पुरवठा योजनेचे पाईप लाईन टाकण्याचे कॉन्ट्रक्ट घेतले आहे. सदर काम तक्रारदार यांनी पूर्ण केले परंतु या योजनेतील देहरी गावच्या विहीरीतून उचले गावास पाणी घेण्यास देहरी ग्रामपंचायत परवानगी देत नसल्यालने उचले ग्रामपंचायतीकडून नवीन विहीर खेदण्याचा ठराव करण्यात आला आहे. सदर ठरावाची प्रत तक्रारदार यांना, त्यांनी यापूर्वी केलेल्या कामाचे बिलाच्या अनुषंगाने उपअभियंता पाणी पुरवठा विभाग, मुरबाड यांना सादर करावयाचे असल्याने झालेला ठराव व मागणीपत्राची प्रत मिळणेकामी आरोपी खाजगी इसम संतोष खंडागळे तक्रारदार यांचेकडे दि. २०/०२/२०२४ रोजी ७०,०००/- रु. लाचेची मागणी केल्याने तक्रारदार यांनी त्यांचे विरूध्द कारवाई करण्याकरिता ॲन्टी करप्शन ब्युरो, ठाणे येथे दि. २०/०३/२०२४ लेखी तक्रार दिलेली आहे.<br>नमुद तक्रारीच्या अनुषंगाने दि. २०/०२/२०२४ रोजी केलेल्या पडताळणी मध्ये यातील खाजगी इसम संतोष रमेश खंडागळे यांनी तक्रारदार यांचेकडे त्यांचे काम पुर्ण करण्यासाठी ७०,०००/-रू लाचेची मागणी करून तसेच उचले ग्रामपंचायत सदस्य इ.लो.से. सोमनाथ देशमुख याने सदर लाचेची रक्कम देण्यासाठी तक्रारदार यांना प्रोत्साहित करुन खाजगी इसम संतोष खंडगळे याने मागणी केलेली लाचेची रक्कम स्विकारण्याचे मान्य केले. त्याअनुषंगाने लाचलुचपत प्रतिबंध, ठाणे विभागाने दि. १८/०३/२०२४ रोजी सापळ्याचे आयोजन करून खाजगी इसम संतोष खंडगळे यांस तक्रारदार यांचेकडून ७०,०००/- रु लाचेची रक्कम स्विकारताना खाजगी इसम संतोष खंडागळे याचे राहते घरी १७.१९ वा. रंगेहात पकडयात आले आहे. |

**मार्गदर्शन अधिकारी - १. मा. श्री. सुनिल लोखंडे, पोलीस अधीक्षक, ॲन्टी करप्शन ब्युरो, ठाणे परिक्षेत्र, ठाणे.**
**२. मा. श्री. गजानन राठोड, अपर पोलीस अधीक्षक, ॲन्टी करप्शन ब्युरो, ठाणे परिक्षेत्र, ठाणे.**
**३. मा. श्री. महेश तरडे-पाटील, अपर पोलीस अधीक्षक, ॲन्टी करप्शन ब्युरो, ठाणे परिक्षेत्र, ठाणे.**

लाचलुचपत प्रतिबंधक विभागातर्फे नागरिकांना आवाहन करण्यात येते कि,भ्रष्टाचार संबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागण्या-या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, ठाणे परीक्षेत्र यांचेशी संपर्क करावा.

---

संपर्क पत्ता - लाप्रवि ठाणे, मध्यवर्ती कारागृहासमोर, ठाणे पश्चिम ४००६०१
संकेत स्थळ- acbmaharastra@mahapolice.gov.in
Email – spacbthane@ mahapolice.gov.in
ॲप्लीकेशन - acbmaharastra.net
टोल फ्रि नंबर- १०६४
दुरध्वनी कमांक - ०२२-२०८१३५९८/२०८१३५९९
व्हॉटसॲप्स् कमांक - ९९३०९९७७००

मा. सविनय सादर
(राजरी शिंदे)
पोलीस निरीक्षक,
अन्टी करप्शन ब्युरो, ठाणे

CamScanner